आर.सी.सी. क्र.१३९१/२०२१
शासन वि. जगन
नि.क्र.२०

**(व्ही. सी. व्दारे)**

अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.०५ चा शपथेवर जबाब

माझे नांव — मंगल महादेव सुडके,

माझे वय – ३४ वर्ष, धंदा : पोलीस उप निरीक्षक.

राहणार – सिल्लोड, ता. सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर.

**सरतपास सहाय्यक सरकारी वकील श्रीमती जे. डी. राठोड यांच्यामार्फत सूरू**

०१. सन २०२१ मध्ये मी सदर बाजार पोलीस ठाणे येथे पोलीस उप निरीक्षक म्हणुन कार्यरत होते. दि.१३.१०.२०२१ रोजी प्रस्तुत गुन्हयाचा तपास माझ्याकडे वर्ग करण्यात आला. तपासादरम्यान मी घटनास्थळी जाऊन दोन पंचासमक्ष घटनास्थळ पंचनामा केला. घटनास्थळ बन्सीपुरा, रोशन ट्रान्सपोर्ट पाठीमागे होते. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविला असता तो तोच आहे. त्यावर माझी व दोन पंचांच्या सहया आहेत. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२१** देण्यात येते. मी साक्षीदारांचे जाब जबाब नोंदविले. साक्षीदार राधाबाई यांचा जबाब मी त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविला. त्यांच्या जबाबातील अधोरेखांकित भाग 'अ' त्यांच्या सांगण्याप्रमाणे लिहिलेला आहे. त्यास **नि.क्र.२२** देण्यात येते. आरोपीविरुध्द पुरावा मिळुन आल्याने मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. तपासात असे निष्पन्न झाले की, आरोपीने फिर्यादीचा वाईट उद्देशाने हात धरुन मिठी मारली. आरोपीला दाखविल्यास ओळखु शकेल. व्ही. सी. व्दारे दाखविलेला आरोपी तोच आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. के. एस. सतकर यांच्यामार्फत सुरु–**

०२. घटनेच्या वेळी किती लोक जमा झाले होते ते सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीच्या सांगण्याप्रमाणे साक्षीदारांचे जबाब नोंदविले. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळ पंचनामा घटनास्थळी व पंचासमक्ष केला नाही. हे म्हणणे

आर.सी.सी. क्र.१३९१/२०२१
शासन वि. जगन
नि.क्र.२०

खरे आहे की, मी स्वतंत्र साक्षीदारांचे जबाब नोंदविले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा तपास करुन खोटे दोषारोपपत्र दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

स्वाक्षरीत/-

(सि. म. पाडोळीकर)

दि. १६.०३.२०२६.

मुख्य न्यायदंडाधिकारी, जालना.